ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# भारतीय सार्वजनिक उपक्रमांची विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यातील भूमिका




**डॉ. बाळासाहेब निर्मळ**
साहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग, देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद.

## प्रस्तावना

भारताच्या औद्योगिक विकासाचा विचार करता त्यात मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्याचे दिसून येते. देशातील काही प्रदेश औद्योगिकदृष्ट्या प्रगत आहेत, तर काही अतिशय मागासलेले आहेत. ही स्थिती देशाच्या राष्ट्रीय एक्याच्या दृष्टीने मानली जाते. स्वातंत्र्यप्राप्तीपुर्वी देशात विकासाच्या संधीचे असमान वाटप, उपन्नातील व संम्पत्तीतील विषमता, औद्योगिक मागासलेपणा, बेरोजगारी, भांडवलाची कमतरता, आधुनिक तंत्रज्ञानाची उणीव, पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे मोठ्या प्रमाणातील प्रादेशिक विषमता आणि आर्थिक विकासातील वाढता प्रादेशिक असमतोल हा भारतापुढील गंभीर प्रश्न होता.[19] भारतात स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने संतुलित प्रादेशिक विकास साधण्यास प्राधान्य देण्यात आले. यासाठी भारताने लोकशाही पध्दतीचे नियोजनाचे तत्व स्वीकारले. भारतात नियोजनाच्या दृष्टीने 5 वर्षासाठी पंचवार्षिक योजनाची संकल्पना स्वीकारली भारत सरकारने विविध पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून सार्वजनिक उपक्रमाव्दारे विविध राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात भांडवलाची गुंतवणुक करुन देशामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करणे, लोकांचा जिवनस्तर उंचावणे, देशातील आर्थिक केंद्रीकरणास लगाम लावुन मागास प्रदेशात व्यापार, वाहतूक, दळणवळण आणि पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी अशा प्रदेशात सार्वजनिक उपक्रमांची निर्मिती करण्यावर अधिक भर देण्यात आला. त्यामूळे भारतातील विविध घटक राज्यामध्ये आज सार्वजनिक उपक्रम कार्यरत आहेत. परंतु त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भिन्नता दिसून येते. यांचा आढावा पुढील आकृतीच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**आकृती क्रं. 4.22.**
**कार्यरत सार्वजनिक उपक्रमांची राज्यनिहाय स्थिती**




**Public Enterprises Survey-2005-06, 2013-14**

आकृती क्रं. 4.22. चे अवलोकन केले असता राज्य निहाय कार्यरत सार्वजनिक उपक्रमांचे वर्गीकरण केल्यास असे दिसून येते की देशात एकूण कार्यरत उपक्रमापैकी दिल्ली राज्यामध्ये (40%) उपक्रम कार्यरत आहेत. तर सर्वात कमी उपक्रम कार्यरत असणार्या- राज्यामध्ये पुर्वेकडील राज्य मेघालय 02, नागालॅड 01, मणीपुर 01, अरुणाचल प्रदेश 01, हिमाचल प्रदेश 01 या राज्यामध्ये सर्वात कमी सार्वजनिक उपक्रमांची निर्मिती केली असून त्यातील फक्त 03 उपक्रम कार्यरत आहेत. तर केंद्रशासित प्रदेशामध्ये अंदमान निकोबार, चंदीगड, पांडेचरी यामध्ये देखील सार्वजनिक उपक्रमांचीची संख्या सर्वात कमी आहे. इतर राज्याचा विचार करता आंध्रप्रदेश (4%) झारखंड (3%) महाराष्ट्र (9%) कर्नाटक (6%) तामिळनाडु (4%), केरळ (2%) मध्यप्रदेश (2%) राजस्थान (2%) पश्चिम बंगाल (10%) उत्तर प्रदेश (4%) या प्रमाणात सार्वजनिक उपक्रमांची निर्मिती करण्यात आली आहे. या वरुन असे दिसून येते कि सर्वाधिक उपक्रम दिल्ली राज्यामध्ये असून त्यांची संख्या जवळपास 108 आहे याबरोबरच देशातील प्रगत राज्य महाराष्ट्र (24), आंध्रप्रदेश (10), झारखंड (06), कर्नाटक(16), तामिळनाडु (11), केरळ (06), मध्यप्रदेश (04), राजस्थान (06), पश्चिम बंगाल (27), उत्तर प्रदेश (10) याच राज्यामध्ये सार्वजनिक उपक्रम कार्यरत असल्याने या राज्यांचा औद्योगिक विकास झापाट्याने झाला आहे.सार्वजनिक उपक्रमांच्या माध्यमातून विविध राज्यामध्ये केलेलल्या गुंतवणूकीची माहिती तक्ता क्रं. 4.22. मध्ये दिली आहे.

**तक्ता क्रं. 4.22.**

**उपक्रमामधील गुंतवणुक(State wise Distribution of Block)**

| अ.क्र | राज्य | 1977 | 1987 | 1997 | 2012 | 2013 |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | आंध्रप्रदेश | 390.70 | 6761.52 | 19486.16 | 98514.95 | 112885.61 |
| 02 | अरुणाचल प्रदेश | - | - | 1489.20 | 5470.64 | 11104.80 |
| 03 | असाम | 312.90 | 3808.72 | 12448.89 | 60055.45 | 63602.15 |
| 04 | बिहार | 2509.10 | 6969.2 | 19982.51 | 38218.94 | 43298.69 |
| 05 | छत्तीसगड | | - | - | - | 60498.93 |
| 06 | दिल्ली | 400.70 | 1928.48 | 15014.81 | 67951.54 | 68679.98 |
| 07 | गोवा | 3.30 | 35.27 | 144.57 | 1604.11 | 1618.06 |
| 08 | गुजरात | 523.40 | 3197.79 | 20092.87 | 63568.23 | 69922.70 |
| 09 | हरियाना | 142.70 | 649.69 | 4352.25 | 42075.63 | 44854.43 |
| 10 | हिमाचलप्रदेश | 11.80 | 527.43 | 4720.54 | 31867.77 | 34436.74 |
| 11 | जम्मु-काश्मिर | 5.70 | 117.84 | 6413.36 | 19846.64 | 21531.30 |
| 12 | झारखंड | - | - | - | 36453.78 | 36921.16 |
| 13 | कर्नाटक | 268.20 | 1721.52 | 6439.48 | 51229.79 | 51629.75 |
| 14 | केरळ | 274.10 | 1074.44 | 3991.76 | 29025.98 | 31460.19 |
| 15 | मध्यप्रदेश | 1492.70 | 8571.69 | 21503.52 | 57892.77 | 64929.56 |
| 16 | महाराष्ट्र | 630.30 | 10905.09 | 54854.07 | 241998.57 | 280948.44 |
| 17 | मणीपुर | - | 139.68 | 148.31 | 841.81 | 468.82 |
| 18 | मेघालय | - | 4.27 | 53.43 | 753.57 | 333.80 |
| 19 | मिझोराम | - | - | 30.03 | 998.40 | - |
| 20 | नागालॅड | - | 78.17 | 465.36 | 1570.35 | 1183.68 |
| 21 | ओरिसा | 646.50 | 4637.65 | 17101.40 | 68077.69 | 80811.28 |
| 22 | पंजाब | 197.80 | 641.02 | 2077.85 | 15184.91 | 15800.18 |
| 23 | राजस्थान | 227.10 | 780.95 | 6065.94 | 29332.98 | 31887.35 |
| 24 | सिक्कीम | 0.55 | 241.13 | 3704.81 | 0.00 | 3956.67 |
| 25 | तामिळनाडु | 466.90 | 3018.82 | 13539.28 | 102184.52 | 109738.08 |
| 26 | त्रिपुरा | 160.83 | 830.54 | 4185.58 | 0.00 | 4860.76 |
| 27 | उत्तर प्रदेश | 376.20 | 3913.96 | 20767.92 | 90778.36 | 100320.42 |
| 28 | उत्तरांचल | - | - | - | 23069.62 | 23215.33 |
| 29 | पश्चिम बंगाल | 768.30 | 4524.94 | 18677.33 | 73571.18 | 78906.86 |
| 30 | अंदमान निकोबार | - | 9.89 | 27.10 | 2003.93 | 2581.75 |
| 31 | चंदीगड | - | 4.06 | 289.30 | 429.17 | 504.66 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | पांडेच्चरी | - | 8.53 | 30.40 | 353.72 | 333.41 |
| 33 | इतर. | 1802.80 | 3859.87 | 13082.21 | 60746.05 | 76877.37 |
| | एकुन | 11451.20 | 68051.8 | 284361.52 | 1373526.29 | 1530744.97 |

Source-Public Enterprises Survey-2001-02,2005-06, 2007-08 ,2010-11,2011-12,2012-13

भारत सरकारद्वारा विविध पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून सार्वजनिक उपक्रमाध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूकीस प्राधान्य देण्यात आले. तक्ता क्र. 4.22. राज्यनिहाय विश्लेषण केल्यास असे दिसून येते की 1977 मध्ये देशातील विविध राज्यामध्ये एकूण 11451.20 कोटी रुपयांची गुंतवणुक केली. त्यामध्ये सर्वाधिक गुंतवणुक बिहार (21.91%), मध्यप्रदेश (13.0%), पश्चिम बंगाल (6.71%), ओरिसा (5.65%), महाराष्ट्र (5.50%), तामिळनाडु (4.08%), आसाम (2.73%), आंध्रप्रदेश (3.41%) या राज्यात केली. परंतु पुर्वेकडील आणि राज्यस्थान, आंध्रप्रदेश, कर्नाटक, पंजाब, गोवा इत्यादी राज्यांना दुय्यम स्थान देण्यात आले. 1987 मध्ये सार्वजनिक उपक्रमांच्या माध्यमातून विविध राज्यामध्ये गुंतवणुकीचा प्राधान्य क्रम आणि धोरणात बदल झाल्याचे दिसते. 1987 मध्ये विविध राज्यात 68051.87 कोटी रुपयाची गुंतवणुक केली. त्यामध्ये सर्वाधिक वाटा महाराष्ट्र (16%), मध्यप्रदेश (12.60%), बिहार (10.24%), आंध्रप्रदेश (9.4%), ओरिसा (6.81%), पश्चिम बंगाल (6.65%), उत्तरप्रदेश (5.75%), गुंतवणुक एकूण गुंतवणुकीच्या प्रमाणात केली.

1991 नंतर भारत सरकारने मुक्त व्यवस्थेकडे वाटचाल करताना सार्वजनिक उपक्रमाबाबत व्यापक बदल केले. 1991 च्या औद्योगिक धोरणामध्ये सार्वजनिक उपक्रमांच्या माध्यमातून गुंतवणुक करताना परकीय भांडवल, खाजगी गुंतवणुकदार आणि सरकारी गुंतवणुक यांच्या माध्यमातून विविध राज्यामध्ये गुंतवणुक केली आहे. 1997 मध्ये 284361.52 कोटी रुपयांची एकूण गुंतवणुक केली. त्यातील महाराष्ट्रामध्ये 19.29%,मध्यप्रदेश 7.56% उत्तरप्रदेश बिहार 4.38%,आंध्रप्रदेश 6.85%, गुजरात 7.07%, ओरिसा 4.38%, कर्नाटक 2.26%, दिल्ली 5.28%, असाम 4.38%, हरियाना 1.53%, जम्मु काश्मिर 2.26%, नागालॅड 0.16%, राजस्थान 2.13%, तामिळनाडु 4.76%, हिमाचल प्रदेश 1.66% इत्यादी राज्यामध्ये गुंतवणुक केली. परंतु 1997 नंतर देशातील सर्वच राज्यामध्ये कमी अधिक फरकाने गुंतवणुकीस प्राधान्य दिल्याचे दिसते. हेच धोरण 2013 पर्यंत चालु आहे. 2013 मध्ये 275 केंद्रीय सार्वजनिक उपक्रमाच्या माध्यमातून देशातील विविध राज्यात 1530744.97 कोटी रुपयाची गुंतवणुक केली. याचे राज्य निहाय विश्लेषन केले असता सर्वाधिक गुंतवणुक महाराष्ट्रामध्ये (18.35%) तर सर्वात कमी गुंतवणुक मणीपुर (0.02%) केली आहे. इतर राज्यामध्ये मध्यप्रदेश 4.24%, उत्तरप्रदेश 6.55%, बिहार 2.83%, आंध्रप्रदेश 7.37%, असाम 4.16%, दिल्ली 4.49%, पश्चिम बंगाल 5.16%, हरियाना 2.93%, नागालॅड 0.07%, जम्मु काश्मिर1.41%, गुंतवणुक केली आहे.

थोडक्यात तक्ता क्रं. 4.22. चे सुक्ष्म अवलोकन केले असता असे दिसून येते की भारत सरकारने विविध पंचवार्षिक योजनांमधुन सार्वजनिक उपक्रमांच्या माध्यमातून विविध राज्यात गुंतवणुक केल्यामूळे देशातील अंतर्गत भागांमध्ये औद्योगिकीकरण विकासाला प्रोत्साहन देऊन ही प्रादेशिक तफावत कमी करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. यामुळे देशातील विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत झाली आहे. परंतु ही गुंतवणुक करताना काही राज्याकडे दुर्लक्ष केले आहे. यामध्ये पुर्वेकडील राज्याबरोबरच हिमाचल प्रदेश, राजस्थान, केरळ, जम्मु-काश्मिर, गोवा, उत्तराखंड, पंजाब या राज्याचा समावेश होतो. तर महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश बिहार, आंध्रप्रदेश, गुजरात, ओरिसा, कर्नाटक, दिल्ली, असाम, हरियाना पश्चिम बंगाल, तामिळनाडु या राज्याना अधिक प्राधान्य दिल्याने या राज्यामध्ये औद्योगिकीकरण आणि पायाभूत सुविधा निर्माण झाल्या आहेत. तरिही या राज्यामध्ये उद्योगांची वाढ सर्वसाधारणपणे शहरी भागांमध्ये व बंदरांच्या शहराजवळच जास्त होताना दिसते. आर्थिक सुधारणांचा फायदा औद्योगिकदृष्ट्या प्रगत अशा राज्यांना अधिक होताना दिसतो. या राज्यांमधील शहरीकरण, विकसित बंदरे, सुशिक्षित आणि कुशल कामगार वर्ग ह्या गोष्टींमुळे येथे उत्पादन व सेवाक्षेत्रातील उद्योग आकर्षित होत आहेत.

## निष्कर्ष:

सरकारने सार्वजनिक उपक्रमांची निर्मिती करताना काही राज्यानांच अधिक प्राधान्य दिले आहे . त्यामूळे देशातील कार्यरत सार्वजनिक उपक्रम काही राज्यामध्ये अधिक संख्येने कार्यरत असल्याने त्या राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे . मार्च 2013 मध्ये एकूण केंद्रीय सार्वजनिक उपक्रमाची संख्या 275 आहे. याचे राज्य निहाय वर्गीकरण केल्यास सर्वाधिक उपक्रम दिल्ली राज्यामध्ये असून त्यांची संख्या जवळपास 108 आहे याबरोबरच देशातील प्रगत राज्य महाराष्ट्र (24) आंध्रप्रदेश (10) झारखंड (06) कर्नाटक(16) तामिळनाडू (11), केरळ (06) मध्यप्रदेश (04) राजस्थान (06) पश्चिम बंगाल (27) उत्तर प्रदेश (10) याच राज्यामध्ये सार्वजनिक उपक्रम कार्यरत असल्याने या राज्यांचा औद्योगिक विकास झपाट्याने झाला आहे

भारत सरकारने पंचवार्षिक योजनांव्दारे सार्वजनिक उपक्रमांच्या माध्यमातून विविध राज्यात गुंतवणूक केल्यामूळे देशातील अंतर्गत भागांमध्ये औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देऊन औद्योगिक प्रादेशिक असमतोल कमी करण्याचा प्रयत्न केले. यामुळे देशातील विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत झाली आहे . परंतु ही गुंतवणूक करताना काही राज्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे . यामध्ये पुर्वेकडील राज्याबरोबरच हिमाचल प्रदेश, राजस्थान, केरळ, जम्मु-काश्मिर, गोवा, उत्तराखंड, पंजाब या राज्याचा समावेश होतो. तर महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, आंध्रप्रदेश, गुजरात, ओरिसा, कर्नाटक, दिल्ली, आसाम, हरियाना पश्चिम बंगाल ,तामिळनाडू या राज्यांना अधिक प्राधान्य दिले.

2013 मध्ये 275 केंद्रीय सार्वजनिक उपक्रमाच्या माध्यमातून देशातील विविध राज्यात 1530744.97 कोटी गुंतवणूक करण्यात आली. याचे राज्यनिहाय विश्लेषण केले असता सर्वाधिक गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये (18.35%) तर सर्वात कमी गुंतवणूक आसाम (0.02%) केली. इतर राज्यामध्ये मध्यप्रदेश 4.24% उत्तरप्रदेश 6.55% बिहार 2.83% आंध्रप्रदेश 7.37% आसाम 4.16% दिल्ली 4.49% पश्चिम बंगाल 5.16% हरियाना 2.93% नागालँड 0.07%जम्मु-काश्मिर 1.41% गुंतवणूक करण्यात आली आहे.

## शिफारशीः

औद्योगिक विकासाचा असमतोल दुर करण्यासाठी सरकारने सरकारी सार्वजनिक उपक्रमांची स्थापना करताना औद्योगिक दृष्ट्या मागसलेल्या राज्याना प्राधान्य देण्यात यावे . ज्या राज्यात किंवा परिसरात लोकउद्योगांची उभारणी झाली आहे . त्या परिसरातुन कर्मचार्यांरची भरती करण्यासंदर्भात कोणतेही तांत्रिक निर्बंध नाहीत . प्रकल्पाच्या अवतीभोवती परिसरातील लोकांची नेमणुक विशेषतः कनिष्ठ श्रेणी पदावर करणे संबधित लोकउपक्रमांच्या दृष्टीने फायद्याचेच आहे . विशेष करुन अकुशल कामगारांची भरती ही जवळपासच्या प्रदेशातुन करावी आणि त्यातही भुसंपादन करताना जर काही लोक विस्थापित झाले असतील तर त्यांना आणि अनुसूचीत जाती आणि जमातीच्या लोकांना अधिक प्राधान्य देण्यात यावे. व तशी कायदेशीर तरतूद संबधित उपक्रमाबाबत करावी.

थोडक्यात भारतामध्ये औद्योगिक विकास, सरकारच्या आर्थिक आणि सामाजिक धोरणाच्या अंमलबजावणीचे महत्वपूर्ण साधन , रोजगारांच्या संधी, प्रादेशिक असमतोल दुर करुन देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये महत्व पूर्ण योगदान दिले आहे. त्यामूळे 1991 नंतर सार्वजनिक उपक्रमांच्या धोरणात बदल करताना रचनात्मक आणि प्रक्रियात्मक बदल केले जात आहे त्यामूळे सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता , कार्यक्षमता यामध्ये वाढ होत असून आणखी उत्पादकता, कार्यक्षमता वाढवण्यासाठी रचनात्मक आणि प्रक्रियात्मक बदलाची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथः

1) Public Enterprises Survey (2013-2014) Vol-I,
2) कटारिया सुरेन्द्र उपरोक्त 1,.पृष्ठ. क्रं.291,292.
3) दत्त एवं सुन्दरम (2012),भारतीय अर्थव्यवस्था, एस.चन्द एण्ड कम्पनी लि.नई दिल्ली
4) कटारिया सुरेन्द्र (2007), आर्थिक नीती एवं प्रशासन ,मलिक एण्ड कम्पनी जयपूर
5) माथुर बी. एल. (2007) 'आर्थिक नीति एवं प्रशासन', आर बीएसए पब्लिशर्स, जयपूर,.